.nagpur

# NMC e NEWS LETTER

नोव्हेंबर २०१७

/nmcngp/ /ngpnmc/ www.nmcnagpur.gov.in/ http://news.nmcnagpur.org/



फ्रान्सचे पत्रकार ग्युल्लाम डेलाक्रॉएक्स यांची मनपाला भेट

## समिती बैठक वृत्त

### मनपा-मेट्रो समन्वय समिती तयार करा : संजय बंगाले

नागपूर : मेट्रोचे काम प्रगतीपथावर आहे. परंतु या कामामुळे नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याच्या तक्रारी येत आहेत. काम झाल्यानंतर तातडीने खड्डे बुजवून रस्ते मोकळे करण्याची जबाबदारी कोणाची, नागरिकांना काय उत्तरे द्यायची, अशा प्रश्नांवर नियंत्रण कुणाचे, असे अनेक प्रश्न आहेत. यासाठी तातडीने मनपा आणि मेट्रोच्या अधिकाऱ्यांची एक समन्वय समिती तयार करा, असे निर्देश मनपाच्या स्थापत्य व प्रकल्प विशेष समितीचे सभापती संजय बंगाले यांनी दिले.

नागपूर महानगरपालिका सीमा क्षेत्रातील मेट्रो रेल्वे कामामुळे रहदारीस अडथळा आणि सुरक्षेच्या संदर्भात काय उपाययोजना आहेत, यावर विचारलेल्या प्रश्नासंदर्भात झालेल्या चर्चेअंती सभापती संजय बंगाले यांनी समन्वय समिती निर्माण करण्याचे निर्देश दिले.

### कॅशलेस विम्याचा प्रस्ताव सादर करा : मनोज चापले

नागपूर : आरोग्याचा प्रश्न कोणाला कधी उद्भवेल, हे सांगता येत नाही. विमा असला तरी वेळेवर त्याची रक्कम मिळत नाही. त्यामुळे नागपूर महानगरपालिकेतील पदाधिकारी, अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी कॅशलेस विमा काढण्याचे विचाराधीन आहे. त्याचा प्रस्ताव पुढील बैठकीत सादर करण्याचे निर्देश आरोग्य समितीचे सभापती मनोज चापले यांनी अधिकाऱ्यांना दिले. मनपा मुख्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति सभागृहात आयोजित वैद्यकीय सेवा व आरोग्य समितीच्या बैठकीत ते बोलत होते. धरमपेठ झोन सभापती रूपा रॉय यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नावर झालेल्या ठरावानुसार पदाधिकारी, अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या कॅशलेस विम्याचा प्रस्ताव बैठकीत चर्चेला आला.

### गरजू महिलांना मिळणार पिको फॉल मशीन:वर्षा ठाकरे

नागपूर : महानगरपालिकेच्या महिला व बाल कल्याण विभागाद्वारे गरजू व गरीब महिलांना पिको-फॉल, काचबटन मशीन्स देण्याचा निर्णय महिला व बाल कल्याण समितीच्या आढावा बैठकीत घेण्यात आला.यावेळी महिला व बाल कल्याण समिती सभापती वर्षा ठाकरे, उपसभापती श्रद्धा पाठक, समितीच्या सदस्या वंदना भगत, जिशान मुमताज मो. इरफान अंसारी, वैशाली नारनवरे, उपायुक्त डॉ.रंजना लाडे प्रामुख्याने उपस्थित होत्या.शहरातील गरीब व गरजू महिलांना काचबटन मशीन्स वाटण्याची मागणी होती. त्याप्रमाणे महिला व बाल कल्याण विभागाच्या बजेटमध्ये त्यासाठी प्रावधान करण्यात आलेले आहे. आतापर्यंत १४७ लाभार्थी महिलांची यादी तयार करण्यात आली आहे. त्यापैकी ६८ लाभार्थी महिलांच्या खात्यात मशीन्सचे पैसे टाकण्यात आले आहे. मशीन वाटप हे प्रभागनिहाय करण्यात यावे व गरजू महिलांना प्राधान्याने मशीन वाटप करण्यात यावे, असे आदेश सभापती वर्षा ठाकरे यांनी दिले.

## इलेक्ट्रिक चार्जिंग स्टेशन विकसित करण्यासाठी फिनलँडसोबत करार

### नागपुरात साकारणार अद्यावत ई-व्हेईकल चार्जिंग स्टेशन



नागपूर : प्रदूषणावर नियंत्रणासाठी तसेच ग्रीन आणि क्लीन उर्जा वापरणाऱ्या वाहनांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने नागपुरात अद्ययावत इलेक्ट्रिक व्हेईकल चार्जिंग स्टेशनच्या विकासासाठी फिनलँडसोबत (फोर्टम इंडिया प्रा लि.) नागपूर महानगरपालिकेने सामंजस्य करार केला आहे. ता. १२ नोव्हेंबर रोजी रेशिमबाग येथील ॲग्रोव्हीजन कार्यक्रमात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या प्रमुख उपस्थितीत मनपा आयुक्त अश्विन मुदगल आणि फिनलँड परिवहन मंत्र्यांचे प्रतिनिधी निना लास्कूनलाठी यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली.यावेळी कार्यकारी महापौर दीपराज पार्डीकर, परिवहन समिती सभापती बंटी कुकडे, नासुप्र सभापती डॉ. दीपक म्हैसेकर, मनपा अतिरिक्त आयुक्त रवींद्र कुंभारे, फिनलँड कौन्सिलचे श्रेयस जोशी, नितीन सोमकुवर, फोर्टम इंडियाचे उपाध्यक्ष अवधेश झा, कार्गोटेक इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक एमसी सुरेश कुमार, वार्टसिला इंडियाचे उपाध्यक्ष परवेज चुकटाए, त्रुतसाला ट्रेडिंगच्या मारिया पॅटिरोकर्नाकरी, मनपा परिवहन व्यवस्थापक शिवाजी जगताप, कार्यकारी अभियंता संजय जयस्वाल, संजय गायकवाड, नरेश बोरकर, उप अभियंता राजेश दुपारे यांच्यासह राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या आधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती होती. शिष्टमंडळाने विमानतळ परिसरात असलेल्या व्हेईकल चार्जिंग स्टेशनला भेट दिली. ग्रीनबसने शिष्टमंडळाने रेशिमबाग मैदानात सुरु असलेल्या ॲग्रोव्हीजनला भेट दिली. यावेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या प्रमुख उपस्थितीत सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली. यावेळी मा. गडकरी यांनी शिष्टमंडळाला मिहान येथे आपण प्रकल्प उभारावा तसेच येथील तरुणांना रोजगार द्यावा, आपल्याला आवश्यक सर्व मुलभूत सुविधा तातडीने उपलब्ध देण्यात येतील, अशी ग्वाही दिली.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक १०० टक्के होणार : देवेंद्र फडणवीस

### तीन महिन्यात आराखडा तयार करण्याचे मनपाला निर्देश



नागपूर : यशवंत स्टेडियम परिसर धंतोली येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक १०० टक्के होणार असून नागपूर महानगरपालिकेने तीन महिन्यात आराखडा तयार करुन शासनाकडे सादर करावा असे निर्देश राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. मनपा स्थायी समिती अध्यक्ष संदीप जाधव यांच्या नेतृत्वात सत्तापक्ष नेते संदीप जोशी, माजी महापौर प्रवीण दटके यांच्यासह बसपा पक्षनेता मो. जमाल, नगरसेवक जितेंद्र घोडेस्वार, नरेंद्र वालदे, मो. इब्राहीम, धर्मपाल मेश्राम आदी नगरसेवकांच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्र्यांची भेट घेतली.अनेक वर्षांपासून प्रलंबित डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारकाचे कार्य सुरु करावे अशी मागणी मागिल महिन्यात झालेल्या मनपाच्या आमसभेत नगरसेवकांनी केली. यावर सत्तापक्षनेते संदीप जोशी यांनी पुढील आमसभेपूर्वी मुख्यमंत्र्यांची या विषयावर नगरसेवकांची चर्चा घडवून आणण्याचे आश्वासन दिले होते. हेच शब्द पाळून शनिवारी शिष्टमंडळाने मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. तीन महिन्यात मनपाने याचा आराखडा तयार करुन शासनाकडे पाठवावा असे निर्देशही दिले.



## नागरिकांशी सौजन्याने वागा

### महापौरांनी दिल्या सूचना:'उपद्रव शोध पथक' तैनात

नागपूर : स्वच्छतादूत म्हणून तुमची नियुक्ती करण्यात आली आहे. नागरिकांशी सौजन्याने वागा. आपला संयम कायम ठेवत काम करावे, अशा सूचना महापौर नंदा जिचकार यांनी महानगरपालिकेत नव्याने रूजू झालेल्या स्वच्छतादूतांना दिल्या.महाल येथील राजे रघुजी भोसले नगर भवनात आयोजित उपद्रव शोध पथकासाठी आयोजित कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर स्थायी समिती सभापती संदीप जाधव, सत्तापक्ष नेते संदीप जोशी, आयुक्त अश्विन मुदगल, ज्येष्ठ नगरसेवक दयाशंकर तिवारी, अतिरिक्त उपायुक्त जयंत दांडेगावकर, आरोग्य अधिकारी डॉ. प्रदीप दासरवार प्रामुख्याने उपस्थित होते.पुढे बोलताना महापौर म्हणाल्या, ज्या पद्धतीने आपण सेनेत काम करीत होता त्याच पद्धतीने येथे कामे करायची आहेत. नागरिकांना शिस्त लागावी, यादृष्टीने कार्य करायचे आहे. काम करताना सकारात्मकता बाळगा, असा सल्ला महापौरांनी दिला.

सत्तापक्ष नेते संदीप जोशी म्हणाले, सेनेतील सैनिकांचे काम हे चोख व शिस्तबद्ध असते हे समाजातील प्रत्येक नागरिकांना माहिती आहे. नागरिकांना शिस्त लागावी, यासाठी ही नियुक्ती असल्याचे त्यांनी सांगितले. नागरिकांवर कारवाई करण्यापूर्वी यासंदर्भातील जनजागृती करावी, पत्रके वाटून पूर्वसूचना देण्यात यावी, असा सल्लासुद्धा त्यांनी दिला. आपल्या वागणुकीवर महानगरपालिकेची पत अवलंबून असल्याचे त्यांनी सांगितले. शहराच्या नागरिकांमध्ये स्वच्छतेविषयी शिस्त नाही आणि मनपाचे स्वच्छतेबाबतचे धोरण अतिशय कडक आहे. याला शहराचे नागरिक छेद देताना दिसून येत असल्याचे आढळत आहे. यासर्वांवर आळा घालण्यासाठी 'उपद्रव शोध पथक' तैनात करण्याचा निर्णय मनपाने घेतला आहे. नागरिकांना शिस्त लावण्यात यावी. आपली विवेकबुद्धी जागृत ठेवून कामे करावी. या स्वच्छतादूतामुळे आपण शहर स्वच्छ ठेवण्यात यशस्वी होऊ शकतो, असा विश्वास आयुक्त अश्विन मुदगल यांनी व्यक्त केला. प्रास्ताविक अतिरिक्त उपायुक्त जयंत दांडेगावकर यांनी केले. उपद्रव शोध पथकामध्ये ८७ जणांची नियुक्ती करण्यात आली आहे.

## मनपातर्फे स्वर्गीय बाळासाहेबांना अनोखी श्रद्धांजली

नागपूर : शिवसेनेचे संस्थापक स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या पुण्यतिथीनिमित्त नागपूर महानगरपालिकेतर्फे अनोखी श्रद्धांजली वाहण्यात येत आहे. महाल मधील चिटणीसपुरा शाळेच्या जागेवर स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे स्मारकाचा आकर्षक असा विकास आराखडा नागपूर मनपाने तयार केला आहे. राजकारणापलिकडील बाळासाहेब ठाकरे या संकल्पनेवर या स्मारकाचे डिझाईन साकारण्यात येत आहे. कुशल राजकारणी या व्यतिरिक्त बाळासाहेब ठाकरे यांची अत्यंत प्रभावी व्यंगचित्रकार म्हणूनही ओळख होती. हाच धागा पकडून या स्मारकाला कला व सांस्कृतिक केंद्राचे स्वरुप देण्यात आले आहे. शहरातील विद्यार्थी व उद्योन्मुख कलाकारांना अत्यल्प दरांमध्ये विविध सुविधा व व्यासपीठ या स्मारकाच्या स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात येईल. शाळेमागील उद्यानालासुद्धा एक नवीन स्वरुप देऊन या स्मारकामध्ये समाविष्ट करण्यात आले

या मध्ये ३०० जणांसाठीचे वातानुकुलित सभागृह, मल्टीपर्पज हॉल, छायाचित्रकार व चित्रकारांसाठी आर्ट गॅलरी, नाट्य व संगीताच्या तालमीसाठी सराव कक्ष, ओपन एअर ॲम्पी थिएटर तसेच बाळासाहेब ठाकरेंचा पुतळा व त्यांनी काढलेले व्यंग्यचित्र व जीवनपटाचे एक प्रदर्शन येथे राहील. ई-लायब्ररी व बुक लायब्ररीचा सुद्धा या प्रकल्पात समावेश आहे. शाळा व गार्डनमधील मोठ्या झाडांचे जतन करुन आकर्षक लँडस्केपिंग केल्या जाईल. ईमारतीची डिझाईन व रचना ग्रीन बिल्डींग च्या धर्तीवर करण्यात आली असून नैसर्गिक साधने व ऊर्जा याचा वापर करण्यात आला आहे. अशा प्रकारे सामाजिक कलागुणांना वाव देणारे हे कला व सांस्कृतिक केंद्र स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांना अनोखी श्रद्धांजली ठरेल व नागपूरच्या कला व सांस्कृतिक क्षेत्रात अत्यल्प दराने सुविधा उपलब्ध करुन व आकर्षक डिझाईनद्वारे मोलाचे योगदान देईल.

# थोडक्यात...



## संविधान दिनानिमित्त अभिवादन

नागपूर : भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधानाची प्रत राष्ट्राला अर्पण केली. त्याप्रीत्यर्थ नागपूर महानगरपालिकेतर्फे स्थायी समिती सभापती संदीप जाधव, माजी महापौर व आमदार प्रा.अनिल सोले यांनी संविधान चौक स्थित डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. यावेळी संविधान प्रास्ताविकेचे सामूहिक वाचनही करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय सफाई कामगार आयोगाचे सदस्य दिलीप हाथीबेड, नगरसेवक ड. धम्मपाल मेश्राम, क्रीडा समितीचे उपसभापती प्रमोद तभाने, नगर सेवक सर्वश्री सुनील हिरणवार, जितेंद्र घोडेस्वार, किशोर जिचकार, नरेंद्र वालदे, नगरसेविका पल्लवी श्यामकुळे ड. मिनाक्षी तेलगोटे, मनपाचे जनसंपर्क अधिकारी अशोक कोल्हटकर, मनपा कर्मचारी संघाचे कार्याध्यक्ष राजेश हाथीबेड, अशोक मेंढे, सतीश सिरसवान, भोलानाथ सहारे, बबली मेश्राम, मो. जमील अन्सारी, सुनील शंकर, विजय भैसारे, अजय झंझोटे, सुभाष पारधी, अजय करोसिया आदी उपस्थित होते.



## नागपूर महानगरपालिकेत इंदिरा गांधींना अभिवादन

नागपूर : राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक असलेल्या राष्ट्रमाता माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या जयंती व जन्मशताब्दी वर्षानिमित्ताने उपमहापौर दीपराज पार्डीकर यांनी महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय एकात्मतेची शपथ दिली. नागपूर महानगरपालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज नवीन प्रशासकीय इमारतीतील दालनात अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. उपमहापौर दीपराज पार्डीकर यांच्यासह विरोधी पक्ष नेते तानाजी वनवे, मनपा आयुक्त अश्विन मुदगल यांनी भारतरत्न इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून अभिवादन केले. यावेळी नगरसेवक किशोर जिचकार, अपर आयुक्त रवींद्र कुंभारे, उपायुक्त डॉ. रंजना लाडे, उपायुक्त रवींद्र देवतळे, उपायुक्त राजेश मोहिते, अतिरिक्त उपायुक्त जयंत दांडेगावकर, सहायक आयुक्त महेश धामेचा, मिलिंद मेश्राम, नगररचना उपसंचालक सुप्रिया थूल यावेळी उपस्थित होते. शांतीनगर येथील त्यांच्या पुतळ्याला उपमहापौर दीपराज पार्डीकर आणि विरोधी पक्ष नेता तानाजी वनवे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

## फ्रान्सचे पत्रकार ग्युल्लाम डेलाक्रॉएक्स यांची मनपाला भेट

नागपूर : फ्रान्स मधील अग्रक्रमांकावरील ले-मॉनडे या वृत्तपत्राचे पत्रकार ग्युल्लाम डेलाक्रॉएक्स यांनी नागपूर महानगरपालिकेला भेट दिली. महापौर नंदा जिचकार व स्मार्ट सिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.रामनाथ सोनवणे यांची डेलाक्रॉएक्स यांनी भेट घेऊन नागपूर स्मार्ट सिटी अंतर्गत सुरू असलेल्या विविध प्रकल्पांबाबत चर्चा केली.नागनदी स्वच्छता अभियान, बायोइथेनॉल बसेस, सोलर ऊर्जा याबाबत नागपुरात सुरू असलेल्या प्रकल्पांची माहिती महापौर नंदा जिचकार यांनी त्यांना दिली. नागपुरात सुरू असलेल्या उपक्रमांचे डेलाक्रॉएक्स यांनी कौतुक केले. यावेळी महापौरांनी तुळशीचे रोप व मनपाचे स्मृतीचिन्ह भेट देऊन ग्युल्लाम डेलाक्रॉएक्सचा सत्कार केला.

# सर्व स्तरातील विद्यार्थ्यांपर्यंत प्राथमिक शिक्षण पोहचविण्यासाठी महानगरपालिका कटीबद्ध : दीपराज पार्डीकर

### मुख्याध्यापकांची कार्यशाळा : मनपा व आरटीई ॲक्शन कमिटीचे आयोजन

नागपूर : शिक्षण हा प्रत्येक नागरिकाचा मुलभूत अधिकार आहे. नागपूर शहरातील सर्व स्तरातील विद्यार्थ्यांपर्यंत प्राथमिक शिक्षण पोहचविण्यासाठी महानगरपालिका कटीबद्ध आहे, असा विश्वास उपमहापौर दीपराज पार्डीकर यांनी व्यक्त केला.कविवर्य सुरेश भट सभागृहात महानगरपालिका व आरटीई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शहरातील शाळेच्या मुख्याध्यापकांच्या कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर क्रीडा समिती सभापती नागेश सहारे, माजी उपमहापौर व शिवसेना पक्ष नेते किशोर कुमेरिया, शिक्षण समिती उपसभापती स्नेहल बिहारे, हनुमाननगर झोन सभापती भगवान मेंढे, नगरसेविका शीतल कामडे, नागपूर महानगरपालिकेच्या उपायुक्त डॉ. रंजना लाडे, अतिरिक्त उपायुक्त जयंत दांडेगावकर, शिक्षणाधिकारी संध्या मेडपल्लीवार, आरोग्य विभागाचे अधीक्षक मदन सुभेदार, जिल्हा परिषदेचे विस्तार अधिकारी श्री. राऊत, आरटीई क्शन कमिटीचे अध्यक्ष शाहीद शरीफ, पोद्दार इंटरनॅशनल स्कूलच्या मुख्याध्यापिका जिनद सैय्यद प्रामुख्याने उपस्थित होत्या. पुढे बोलताना दीपराज पार्डीकर म्हणाले, भारत सरकारच्या निर्देशानुसार सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत शिक्षणाचा प्रसार सर्वत्र होत आहे. २५ टक्के ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया व त्याबाबतीत पालकांना व शिक्षकांना वारंवार तक्रारी येतात. या कार्यशाळेच्या माध्यमातून त्या तक्रारींचे निवारण होईल यात शंका नाही, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. अशा प्रकारच्या कार्यशाळेचे आयोजन सातत्याने व्हावे, अशी सूचना देखील त्यांनी यावेळी दिली.याप्रसंगी बोलताना क्रीडा समिती सभापती नागेश सहारे म्हणाले, अशा प्रकारच्या कार्यशाळेचे आयोजन केल्याने शिक्षकांना व मुख्याध्यापकांना त्याचा नक्कीच फायदा होणार आहे. गोरगरीबांना शिक्षण देण्यासाठी महानगरपालिका सक्षम आहे, असेही ते म्हणाले. माजी उपमहापौर व शिवसेना नेते किशोर कुमेरिया यांनी यावेळी कार्यशाळेच्या आयोजनाबद्दल आयोजकांचे आभार मानले.यावेळी अतिरिक्त उपायुक्त जयंत दांडेगावकर यांनी भारत सरकारच्या स्वच्छ भारत अभियानाबद्दल माहिती सांगितली तसेच 'स्वच्छता सर्वेक्षण-२०१८' बाबत आवश्यक ती जनजागृती करण्याचे आवाहन केले. प्रास्ताविक उपायुक्त डॉ. रंजना लाडे यांनी केले



## मनपाच्या शाळांत विद्यार्थी दिवस

नागपूर : घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सन ७ नोव्हेंबर १९०० मध्ये शाळा प्रवेश घेतला होता. हा दिवस राज्य शासनाने 'विद्यार्थी दिवस' म्हणून जाहीर केला. त्या अनुषंगाने नागपूर शहरातील मनपाच्या विविध शाळांमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करून हा दिवस साजरा करण्यात आला.नेताजी मार्केट हिंदी माध्यमिक शाळेमध्ये आयोजित कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मनपाचे शिक्षण समिती सभापती प्रा. दिलीप दिवे, क्रीडा समितीचे सभापती नागेश सहारे, उपसभापती प्रमोद तभाने, मनपाच्या शिक्षणाधिकारी संध्या मेडपल्लीवार, मुख्याध्यापिका साधना सयाम उपस्थित होत्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण आणि दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. शिक्षण समिती सभापती प्रा. दिलीप दिवे यांनी विद्यार्थी दिवसाची महत्ता सांगताना या दिवसाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यातील अभ्यासू वृत्तीची प्रेरणा घ्यावी, असे आवाहन विद्यार्थ्यांना केले. क्रीडा समिती सभापती नागेश सहारे यांनी विद्यार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यातील विद्यार्थ्याची माहिती देत शिक्षणाचा काय परिणाम होतो हे डॉ. बाबासाहेबांनी दाखवून दिल्याचे सांगितले. उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन संजय म्हाला यांनी केले. आभार मनिषा फुलंबरकर यांनी मानले.

## मनपा शाळांच्या विद्यार्थ्यांनी केली कलांची मुक्त उधळण


### वाल्मिकीनगर आणि संजयनगर शाळेने मारली बाजी

नागपूर : पंडित जवाहरलाल नेहरू जयंतीनिमित्त नागपूर महानगरपालिकेच्या शिक्षण विभागातर्फे स्थानिक रा.पै. समर्थ स्टेडियम, चिटणवीस पार्क येथे आयोजित बाल दिनाच्या कार्यक्रमात मनपा शाळांतील विद्यार्थ्यांनी कलांची मुक्त उधळण केली. आगळ्यावेगळ्या पद्धतीने आयोजित या कार्यक्रमात उपस्थित मनपा शाळांतील विद्यार्थ्यांच्या गर्दीने स्टेडियम फुलून गेले होते. सर्व शाळांमधून वाल्मिकीनगर हिंदी माध्यमिक शाळेच्या मुलींच्या संघाने तर संजयनगर हिंदी माध्यमिक शाळेच्या मुलांच्या संघाने पथसंचलन मध्ये बाजी मारत आपले वर्चस्व सिद्ध केले.मुलींच्या गटात द्वितीय क्रमांक लाल बहादूर शास्त्री हिंदी माध्यमिक शाळेने पटकाविला तर दुर्गानगर माध्यमिक शाळा तृतीय क्रमांकाची मानकरी ठरली. मुलांच्या गटात द्वितीय क्रमांक विवेकानंद नगर हिंदी माध्यमिक शाळेने तर तृतीय क्रमांक जयताळा माध्यमिक शाळेने पटकाविला.

कार्यक्रमाचे उद्घाटन कार्यकारी महापौर दीपराज पार्डीकर यांच्या हस्ते पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेसमोर दीपप्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी मंचावर विरोधी पक्ष नेते तानाजी वनवे, शिक्षण समितीचे सभापती प्रा. दिलीप दिवे, क्रीडा समितीचे सभापती नागेश सहारे, अग्निशमन व विद्युत समितीचे सभापती ड. संजयकुमार बालपांडे, गांधीबाग झोन सभापती सुमेधा देशपांडे, हनुमाननगर झोन सभापती भगवान मेंढे, धरमपेठ झोन सभापती रूपा रॉय, शिक्षण समितीच्या उपसभापती स्नेहल बिहारे, क्रीडा समितीचे उपसभापती प्रमोद तभाने, शिक्षण समितीचे सदस्य राजेंद्र सोनकुसरे, स्वाती आखतकर, विजय झलके, नगरसेविका विद्या कन्हेरे, ममता सहारे, सरला नायक, उपायुक्त रवींद्र देवतळे, शिक्षक संघाचे सचिव देवराव मांडवकर, शिक्षणाधिकारी संध्या मेडपल्लीवार, सहायक शिक्षणाधिकारी कुसूम चाफलेकर, शिक्षक संघाच्या कोषाध्यक्षा मलविंदर कौर लांबा आदी उपस्थित होते. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

## सायकल स्पर्धेमुळे नागपूरच्या शिरपेचात मानाचा तुरा : नंदा जिचकार

### सांगलीचा दिलीप माने प्रथम तर शिवाजी बंडकर दुसरा



नागपूर : राज्यस्तरीय सायकल स्पर्धेमुळे नागपूरच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. अशा सायकल स्पर्धेच्या माध्यमातून पर्यावरणपूरक शहराचा संदेश देण्यात येईल, असा विश्वास महापौर नंदा जिचकार यांनी व्यक्त केला. नागपूर महानगरपालिका आणि ऑरेंज सिटी सायकलिंग असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने भव्य राज्यस्तरीय सायकल स्पर्धेच्या बक्षिस वितरण समारंभप्रसंगी त्या बोलत होत्या.यावेळी व्यासपीठावर उपमहापौर दीपराज पार्डीकर, शिक्षण समिती सभापती दिलीप दिवे, क्रीडा समिती सभापती नागेश सहारे, उपसभापती प्रमोद तभाने, धरमपेठ झोन सभापती रूपा राय, नगरसेविका कृतिका मेश्राम, असोसिएशनचे अध्यक्ष प्रदीप उबाळे प्रामुख्याने उपस्थित होते.पुढे बोलताना महापौर नंदा जिचकार म्हणाल्या, मोबिलिटीसाठी सायकल एक महत्वाचे साधन आहे. सायकल स्पर्धेमुळे पर्यावरणपूरक शहराचा एक संदेश दिला गेला. अश्याच प्रकारच्या सायकल स्पर्धेचे आयोजन शाळास्तर,महाविद्यालय स्तरावर करण्यात यावे, असेही त्या यावेळी म्हणाल्या. नागपूर ते कोंढाळी – नागपूर अशी जलद सायकल स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. त्यात प्रथम पारितोषिक सांगलीचा दिलीप माने, दुसरे पारितोषिक सांगलीचा करण शिवाजी बंडकर, तिसरे पारितोषिक विठ्ठल भोसले (पुणे), चवथे पारितोषिक शुभम् दास (नागपूर), पाचवे पारितोषिक ए.राजकुमार (औरंगाबाद) यांनी प्राप्त केले.उत्तेजनार्थ बक्षीस – प्रकाश ओलेकर, हर्षल शेंडे, स्वप्नील लाड, प्रवरा राकेश भैया, जाधव उत्कर्ष आत्राम यांना देण्यात आले. तत्पुर्वी सकाळी ६.३० वाजता संविधान चौकात जिल्हा पोलिस अधीक्षक शैलेश बलकवडे यांनी हिरवी झेंडी दाखवून स्पर्धेला सुरुवात केली. यावेळी मनपाचे क्रीडा सभापती नागेश सहारे, उपसभापती प्रमोद तभाने प्रामुख्याने उपस्थित होते.